# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:17.05.2026** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या**

- वर्तमान दशकात भारत आणि नेदरलँडस विश्वासार्ह, पारदर्शक आणि भविष्यवेधी पुरवठा साखळी तयार करण्यासाठी एकत्रित काम करत असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
- नीट प्रश्नपत्रिका फुटल्याप्रकरणी, सीबीआयकडून काल पुण्यात आणखी एका मुख्य सूत्रधार महिलेला अटक.
- आशियाई भारत्तोलन अजिंक्यपद स्पर्धेत, भारताच्या संजनाला तीन कास्यपदकं आणि
- येत्या दोन दिवसांत केरळमध्ये जोरदार ते अती जोरदार पावसाचा तर विदर्भात उष्णतेची लाट येण्याचा हवामान विभागाचा अंदाज.

**<u>पंप्रदौरानेदरलँडस</u>**

आपत्ती आणि संकटांचं दशक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वर्तमान दशकात भारत आणि नेदरलँडस विश्वासार्ह, पारदर्शक आणि भविष्यवेधी पुरवठा साखळी तयार करण्यासाठी एकत्रित काम करत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी  केलं. पाच दिवसांच्या परदेश दौऱ्यात काल नेदरलँडस्इथल्या प्रवासी भारतीयांच्या कार्यक्रमात पंतप्रधान सहभागी झाले होते, त्यावेळी ते बोलत होते. वर्तमान जागतिक संघर्षाची परिस्थिती, उद्भणारे ऊर्जा संकट यांसारख्या आव्हानांच्या साखळीला सामोरे जाण्यास अपयश आल्यास जागतिक पातळीवर लोकसंख्येचा मोठा भाग गरिबीत ढकलला जाऊ शकतो असंही मोदी यावेळी म्हणाले. जागतिक स्तरावर भारताची भूमिका वृद्धिंगत होत असल्याचे सांगून पंतप्रधान म्हणाले...

21 वी सदी का भारत अवसरों की भूमी है. भारत टेक्नॉलॉजी ड्रिव्हन भी है.. और ह्युमिडिटी ड्रिव्हन भी है. भारत जितना एन्शंट है उतनाही मॉडन बन रहा है. और विकसित भारत की जर्नी में भागीदारीता भी है.. मै नेदरलँड मे भारतीय समुदाय के सभी साथियों से कहूंगा आप भारत मे ज्यादा से ज्यादा सहयोग बढाये इससे भारत का सामर्थ्य भी बढेगा और आपके इन्वेस्टमेंट पे ज्यादा रिटर्न भी ज्यादा मिलेगा ..

त्यानंतर पंतप्रधानांनी नेदरलँड्सचे राजे विलेम-अलेक्झांडर आणि राणी मॅक्झिमा यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान, नेदरलँडच्या लायडन विद्यापीठाकडून 11 व्या शतकातील चोळ ताम्रपट पंतप्रधानांना भेट देण्यात आले.

दरम्यान पंतप्रधान आपला नेदारलँडस चा दौरा आटोपून आज स्वीडन मधील गोथेनबर्ग इथं पोहोचतील. पंतप्रधान आजपासून दोन दिवस स्वीडन च्या दौऱ्यावर आहेत. नवी दिल्ली आणि स्टॉकहोम यांच्यातील दृढ होत

चाललेल्या मैत्रीपूर्ण संबंधांमधील हा एक ऐतिहासिक टप्पा ठरेल. हा दौरा पंतप्रधानांच्या व्यापक युरोपीय दौऱ्याचा तिसरा टप्पा असून, जानेवारी 2026 मध्ये ऐतिहासिक 'भारत-युरोपीय संघ मुक्त व्यापार करार' अंमलात आल्यानंतर या खंडात केलेला त्यांचा हा पहिलाच दौरा आहे. वेगानं होणारे तांत्रिक बदल आणि भु राजकीय आव्हानांच्या युगात द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेणं आणि परस्पर सहकार्याच्या नव्या संधि शोधणं हा या दौऱ्याचा मुख्य उद्देश आहे.

**दिल्ली मूल्यवर्धित करकपात**

दिल्ली सरकारनं राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात 'एव्हिएशन टर्बाइन इंधना'वरील मूल्यवर्धित कर 25 टक्क्यांवरून 7 टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा एक महत्वपूर्ण निर्णय घेतला असल्याचं दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी सांगितलं. विमान क्षेत्राला दिलासा देणं, पर्यटन आणि मालवाहतूक उपक्रमांना चालना देणं या उद्देशानं दळणवळण आणि आर्थिक उलाढाल बळकट करण्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भर दिला असून त्यानुसार हा निर्णय घेण्यात आल्याचं गुप्ता यांनी सांगितलं. करातील हा सवलतीचा दर सुरुवातीला पुढील सहा महिन्यांसाठी लागू राहील असंही त्या म्हणाल्या.

**नीट**

दिल्ली न्यायालयानं काल नीट पेपर फूटी प्रकरणातील कथित मुख्य सूत्रधार पी. व्ही. कुलकर्णी आणि मनीषा वाघमारे या दोन आरोपींना 10 दिवसांसाठी सीबीआय कोठडीत पाठवलं आहे. पुढील तपासासाठी या दोघांना राष्ट्रीय राजधानीबाहेर नेणं आवश्यक असल्याचं आणि या प्रकरणामागील व्यापक कट-कारस्थानाचा तपास करणं गरजेचं  असल्याचं तपास यंत्रणेनं न्यायालयाला सादर केल्यानंतर, विशेष सीबीआय न्यायाधीश अजय गुप्ता यांनी कुलकर्णी आणि वाघमारे यांना सीबीआय कोठडी सुनावली. दरम्यान सीबीआयनं, काल पुण्यातून आणखी एका मुख्य सूत्रधार महिलेला अटक केली आहे. प्राध्यापक मनीषा मांढरे असं या संशयित आरोपीचं नाव असून, ती पुण्यातील एका महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विषयाची शिक्षिका आहे. सीबीआयनं दिलेल्या माहितीनुसार एनटीएनं या प्रक्रियेत तिची तज्ज्ञ म्हणून नेमणूक केली होती.

**नक्षलअटक**

गडचिरोली जिल्हा नक्षलमुक्त करण्यासाठी सुरू असलेल्या ऑपरेशन अंतिम प्रहार मोहिमेअंतर्गत काल 8 नक्षलवाद्यांना अटक करण्यात आली तर पाच नक्षलवादी पोलिसांसमोर शरण आले. अटक करण्यात आलेल्यांमध्ये कंपनी क्रमांक 10 चा विभागीय सदस्य राजू मंगू वेको आणि त्याची पत्नी जन्नी उर्फ नगी येमला तसंच इतर सहा कंपनी सदस्यांचा समावेश असल्याची माहिती पोलिस अधीक्षक एम.रमेश यांनी काल वार्ताहर परिषदेत दिली. या सर्वांकडून 65 लाख 34 हजार रुपये  रोख रक्कम, एके-47, एसएलआर यासह अन्य बंदुका असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या सर्वांवर 64 लाख रुपयांचं बक्षीस होतं. त्याशिवाय, शरण आलेल्या पाच नक्षलवाद्यांवरही 38 लाख रुपयांचं बक्षीस जाहीर करण्यात आलं होतं. नक्षलवाद्यांना अटक आणि शरणागती यामुळे गडचिरोली जिल्हा नक्षलमुक्त झाल्याचं पोलिस अधीक्षक एम. रमेश यांनी सांगितलं.

**सोमालिया**

सोमालियाच्या लोकप्रतिनिधींमध्ये राजकीय हस्तांतरण प्रक्रियेसंबंधात तीन दिवस सुरू असलेली चर्चा काल कोणताही ठोस निर्णय न होता संपली. राष्ट्राध्यक्ष हसन शेख मोहमूद यांचा चार वर्षांचा कार्यकाळ काल संपला. अध्यक्षीय आणि संसदीय कार्यकाळ पाच वर्षांपर्यंत वाढवण्यासाठीच्या घटनादुरुस्तीला मंजुरी दिली होती,

मात्र विरोधी पक्ष आणि काही संघीय सदस्य राज्यांनी ही मुदतवाढ नाकारली आहे. सोमालियामध्ये सुरू असलेली मानवतावादी हक्कांची पायमल्ली आणि असुरक्षितता ही मोठी संकटं प्रथम सोडवतीत, असं आवाहन संयुक्त राष्ट्रांच्या सहाय्य समितीनं केलं आहे.

**जम्मू शोध मोहीम**

जम्मू काश्मीरच्या पुंछ जिल्ह्यात सक्रिय असलेल्या दहशतवाद्यांचा मागोवा घेण्यासाठी सुरक्षा दलांनी काल अनेक भागांमध्ये शोध मोहीम सुरू केली आहे. 12 मे ला मेंढर तालुक्याच्या मानकोट भागात घुसखोरीचा एक प्रयत्न हाणून पाडण्यात आला होता, ज्यामध्ये एक दहशतवादी मारला गेला. या घटनेनंतर पुंछच्या विविध भागांमध्ये ही शोधमोहीम हाती घेण्यात आली आहे. नियंत्रण रेषे लगतच्या कृष्णा घाटी क्षेत्रात घुसखोराचा खात्मा झाल्यानंतर, संपूर्ण जिल्ह्यात सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली असून, अतिरिक्त तपासणी नाके उभारण्यात आले आहेत आणि वाहनांची कसून तपासणी केली जात आहे.

**एक राष्ट्र एक निवडणूक**

एक राष्ट्र एक निवडणूक' विधेयकावरील संयुक्त संसदीय समितीनं काल बंगळूरु इथं राजकीय पक्ष, कायदेमंडळ आणि नगरिकांसोबत व्यापक चर्चा केली. प्रसारमाध्यमांना माहिती देताना, समितीचे अध्यक्ष पी. पी. चौधरी म्हणाले की, कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार, माजी मुख्यमंत्री वीरप्पा मोईली आणि भाजप तसंच इतर पक्षांच्या प्रतिनिधींनी संसदेनं जेपीसीकडे पाठवलेल्या 'एक राष्ट्र एक निवडणूक' विधेयकावर आपली मतं मांडली. निवडणुका एकाच वेळी घेण्यासाठी काही राज्यांच्या विधानसभा मुदतपूर्व विसर्जित कराव्या लागतील आणि पक्षांतरबंदी कायदे, अविश्वास ठराव आणि राष्ट्रपती राजवटीमुळ निर्माण होणारे प्रश्न सोडवावे लागतील. वारंवार निवडणुका घेणं राष्ट्रीय हिताचं नाही, कारण त्यामुळे निवडणूक आचारसंहितेमुळे विकासावर परिणाम होतो, आर्थिक घडामोडींना अडथळा येतो, पर्यटनावर प्रतिकूल परिणाम होतो, तसच शिक्षण विभाग, बँका आणि सरकारच्या संबंधित विभागांवरही परिणाम होतो. असंही ते यावेळी बोलताना म्हणाले.

**आशियाईभारत्तोलन**

गांधीनगर इथं सुरू असलेल्या आशियाई भारत्तोलन अजिंक्यपद स्पर्धेत, भारताच्या संजनानं 77 किलो वजनी गटात तीन कास्य पदकं पटकावली. स्नॅच, क्लीन अँड जर्क या प्रकारांमध्ये 220 किलो वजन उचलून तीन पदकं आपल्या नावे केली.

**हवामान**

भारतीय हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी अरबी समुद्र, बंगालचा उपसागर, अंदमान समुद्राचा मोठा भाग, अंदमान बेटे आणि संपूर्ण निकोबार बेटांच्या काही भागांमध्ये आगेकूच केली आहे. त्यानुसार या महिन्याच्या 26 तारखेला केरळमध्ये मॉन्सून दाखल होण्याची शक्यता आहे. येत्या तीन ते चार दिवसांत अंदमान आणि निकोबार बेटं, पश्चिम बंगालचा उपहिमालयीन भाग, सिक्कीम, तामिळनाडू, पुडूचेरी, काराईकल, केरळ तसच मध्य आणि दक्षिण कर्नाटकच्या काही भागात जोरदार ते अतिजोरदार पावसाचा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे. तर पुढील दोन दिवसांत बिहार, छत्तीसगढ, झारखंड, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा,ओदिशा, रायलसीमा, किनारपट्टीजवळील आंध्र प्रदेश, कोकण, गोवा, तेलंगणा, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड या भागांत विजांच्या कडकडाटासह वादळ आणि सोसाट्याचा वारा वाहण्याचा अंदाज

व्यक्त केला आहे. तसंच मध्य प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि विदर्भ या भागांत उद्या उष्णतेची लाट येण्याची शक्यता या हवामान विभागानं वर्तवली आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.